MAHAGURU Page No. :
Date: / /

Paper No - 2

Topic-3] Social Change in Modern Society.

# आधुनिक समाजातील सामाजिक परिवर्तन.

A] सामाजिक परिवर्तनाचा अर्थ [Meaning of Social Change]:-

* प्रस्तावना [Introduction]:- परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. निसर्गाच्या संदर्भात परिवर्तन किंवा बदल हा शब्द नेहमी वापरला जातो. निसर्गाप्रमाणे परिवर्तन हे मानवी समाजाचेदेखील महत्त्वपूर्ण लक्षण आहे. अगदी प्रारंभीच्या आद्य समाजापासुन ते आजच्या प्रगत आधुनिक समाजापर्यंतच्या समाजामध्ये सातत्याने परिवर्तन घडुन आलेले आहे. मानवी समाज पूर्णपणे कधीही स्थिर असत नाही. मनुष्य जसा समाजशील प्राणी आहे, तसा तो परिवर्तनशील प्राणी आहे. सामाजिक संस्था, लहान-मोठे समुह, दर्जा, भुमिका, जिवनपद्धती अशा समाजाच्या घटकामध्ये बदल होतात. परिवर्तनाची ही प्रक्रिया मानवी समाजात सतत सुरु असते. परिवर्तनाच्या प्रक्रियेमुळे समाज प्राचीन काळातील अगदी आद्य अवस्थेपासुन आजच्या प्रगत अशा आधुनिक अवस्थेपर्यंत पोहचलेला आहे.

सामाजिक परिवर्तनाबरोबरच सामाजिक स्थिरता हे देखील मानवी समाजाचे वैशिष्ट्ये आहे. प्रसिद्ध

Scanned with CamScanner

MAHAGURU Page No.: Date: / /

विचारवंत हॅरी जॉन्सन यांच्या मते, 'समाजामध्ये नेहमी दोन प्रक्रिया सुरु असतात.
① समाज व्यवस्थेत स्थिरता निर्माण करणारी प्रक्रिया.
② समाजव्यवस्थेत बदल घडवून आणणारी प्रक्रिया
समाजाचे अस्तित्व टिकवण्यासाठी बदलत्या परिस्थिती बरोबरच समायोजन साधण्याचे काम सामाजिक परिवर्तन या प्रक्रियेच्या माध्यमातून केले जाते. सामाजिक परिवर्तन ही संकल्पना समाजशास्त्रामध्ये एका विशिष्ट अर्थाने वापरली जाते. ती पुढीलप्रमाणे :-

## * व्याख्या [ Defination ] :-

① **हॅरी जॉन्सन** :-
"मुलभूत अर्थाने समाज रचनेतील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय."

② **हॉर्टन आणि हंट** :-
"सामाजिक संरचनेतील आणि सामाजिक संबंधातील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय"

③ **किंग्जले डेव्हिस** :-
"केवळ समाजाच्या संघटनात म्हणजेच समाजाच्या संरचनेत आणि कार्यात घडून येणाऱ्या बदलांनाच सामाजिक परिवर्तन असे म्हणतात."

④ **गिलीन** :-
"समाजमान्य जीवनपद्धतीमध्ये झालेला बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय."
वरील सर्व व्याख्यांच्या आधारे असे निदर्शनास येते की, सामाजिक संरचना, सामाजिक

Scanned with CamScanner

MAHAGURU Page No. :
Date: / /

संघटन, सामाजिक संबंध, सामाजिक जीवनपद्धती यामध्ये होणारा बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय. सामाजिक परिवर्तन या संकल्पनेचा अर्थ, वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :-

① **समाजरचनेतील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन :-**

प्रसिद्ध विचारवंत हॅरी जॉन्सन यांच्या मते, समाजाच्या संरचनेमध्ये कोणत्याही कारणामुळे कोणताही बदल झाला तर अशा बदलांना सामाजिक परिवर्तन म्हणून ओळखले जाते. प्रत्येक मानवी समाजाला संरचना प्राप्त झालेली असते. परस्परसंबंधामध्ये बदल झाला तर त्याचा परिणाम संरचनेवर होऊन संरचनेमध्ये बदल घडून येतात. उदा:- भारतीय समाजात शेतीप्रधान अर्थव्यवस्थेऐवजी उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेला महत्त्व प्राप्त झाल्याने संयुक्त कुटुंब पद्धतीचे विघटन होऊन विभक्त कुटुंबपद्धती निर्माण होऊ लागली आहे.

समाजातील प्रत्येक व्यक्तीला विशिष्ट दर्जा व दर्जानुसार भूमिका पार पाडावी लागते. कोणत्याही कारणाने समाजाच्या रचनेतील कोणत्याही घटकामध्ये बदल झाल्यास संरचनेमध्ये बदल होत असतो. त्यामुळेच समाजरचनेतील (दर्जा, भूमिका, सामाजिक मूल्ये, नियमने, सामाजिक संस्था समूह इ.) होणाऱ्या परिवर्तनास सामाजिक परिवर्तन म्हणून ओळखले जाते.

② **सामाजिक मूल्यांमधील बदल :-**

समाजातील सामाजिक मूल्यांमध्ये झालेला बदल समाजाच्या संरचनेत बदल होण्यास कारणीभूत ठरत असतो. कारण, सामाजिक मूल्ये ही त्या समाजातील सदस्यांनी स्विकारलेली असतात. सामाजिक मूल्ये म्हणजे व्यक्तीच्या वर्तनाविषयीचे योग्य, अयोग्य ठरविण्याचे सदस्यांनी स्विकारलेले सर्व सामान्य स्वरूपाचे आदर्श होय. सामाजिक मूल्यांप्रमाणे व्यक्ती आपली भूमिका पार

Scanned with CamScanner

Date: / /

(4)

पाडते. जर सामाजिक मूल्यांमध्येच बदल झाला तर समाजव्यवस्थेमध्येही बदल घडून येतो.
उदा:- लोकशाही, समता, सामाजिक न्याय इ. सामाजिक मूल्यांनी परंपरागत समाजात बदल घडवून आणलेले आहेत यासही सामाजिक मूल्यांमध्ये होणारे बदल सामाजिक परिवर्तन म्हणून ओळखले जातात.

③ <u>सामाजिक संस्थांमधील बदल:-</u>

मानवी समाजाच्या संस्थनेचे शाश्वत स्वरूप म्हणून सामाजिक संस्थांना ओळखले जाते.
उदा:- कुटुंब, धर्म, शिक्षण, राज्य, जातीसंस्था इ. या सामाजिक संस्थांमध्येच बदल घडून आला तर समग्र समाजामध्ये परिवर्तन घडून येते.
उदा:- संयुक्त कुटुंबाऐवजी विभक्त कुटुंब निर्माण होणे, हुकुमशाही राजवट नष्ट होऊन लोकशाही व्यवस्था प्रस्थापित होणे इ. संस्थात्मक परिवर्तनाची उदाहरणे आहेत.

सामाजिक संस्थामध्ये दर्जा, भूमिका यांची एक विशिष्ट रचना असते, काही नियम असतात. सामाजिक संस्था परस्पर संबंधित असतात. त्यामुळे एखादया संस्थेत बदल झाल्यास त्याचे परिणाम समाजव्यवस्थेवरती होत असतात. त्यामुळे सामाजिक संस्थामध्ये होणाऱ्या बदलांना सामाजिक परिवर्तन म्हणून ओळखले जाते.

Scanned with CamScanner

④ सामाजिक संबंधीमधील बदल :-
प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ मॅक आयव्हर व पेज यांच्या मते, सामाजिक संबंधातील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय. समाज म्हणजे सामाजिक संबंधाचे जाळे होय. त्यामुळे सामाजिक संबंधामध्येच बदल झाला तर संपुर्ण समाजामध्ये परिवर्तन घडून येते. समाजातील सामाजिक संबंध हे व्यक्ति-व्यक्ति, व्यक्ति-समुह व समुह-समुहामध्ये प्रस्थापित होत असतात. अशा संबंधांमध्ये सातत्याने बदल, परिवर्तन होत असतात. परिणामी सामाजिक संबंधातील बदलांना सामाजिक परिवर्तन म्हणून ओळखले जाते.

⑤ सार्वत्रिक घटना :-
सामाजिक परिवर्तन हे सार्वत्रिक स्वरूपात घडणारी घटना आहे. सर्वच मानवी समाजामध्ये परिवर्तन हे होत असते. कोणताही समाज कधीही पुर्णपणे स्थितीशील असत नाही. फरक एवढाच की, समाजा-समाजामधील परिवर्तनाच्या गतीमध्ये भिन्नता दिसुन येते. सामाजिक परिवर्तन ही एक सार्वत्रिक स्वरुपामध्ये घडणारी घटना म्हणून ओळखली जाते.

⑥ निरंतर प्रक्रिया :-
मानवी समाजामध्ये परिवर्तन प्रक्रिया नेहमी सुरू असते. ही प्रक्रिया कोणत्याही समाजात कधीही पुर्णपणे स्थिर किंवा थांबलेली निदर्शनास येत नाही. परिवर्तनाच्या प्रक्रियेमधील काही बदल मूर्त असतात तर काही बदल अमूर्त स्वरूपाचे असतात. प्राचीन काळापासुन ते आजच्या आधुनिक काळापर्यंत परिवर्तनाची प्रक्रिया निरंतरपणे घडून आल्याचे दिसुन येते. परिणामी सामाजिक परिवर्तन ही निरंतरपणे घडणारी प्रक्रिया म्हणून ओळखली जाते.

Scanned with CamScanner

## ⑦ पूर्वकथन किंवा भविष्यवाणी अशक्य :-

सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेसंदर्भात अचूकपणे भविष्य कथन करणे, अशक्य आहे. त्याचे कारण परिवर्तन हे नियोजनपूर्वक तसेच पूर्वनियोजनाशिवाय देखील घडून येत असते. परिवर्तनाविषयी काही अंदाज बांधले जातात. तसेच काही अंदाज बांधता येतील परंतु याच पद्धतीने परिवर्तन होईल हे खात्रीशीरपणे सांगता येत नाही. परिवर्तनामध्ये काय होईल? याचे पूर्वकथन करणे अशक्य असते.

## ⑧ तटस्थ संकल्पना :-

सामाजिक परिवर्तन ही एक उदासीन संकल्पना आहे. समाजामध्ये होणाऱ्या बदलांना उद्देशून ही संकल्पना वापरली जाते. परंतु परिवर्तन हे चांगले की वाईट असे, अल्पकाळासाठी असेल की दिर्घकाळासाठी असेल. परिवर्तनातून फायदा की तोटा होईल अशा प्रकारची चर्चा समाजशास्त्रामध्ये अभिप्रेत नाही. कारण या संकल्पनेवर कोणतेही बंधन किंवा मर्यादा नाही.

## ⑨ सामाजिक परिवर्तन आणि सांस्कृतिक परिवर्तन यामध्ये फरक आहे :-

सामाजिक परिवर्तन आणि सांस्कृतिक परिवर्तन या दोन्ही संकल्पना भिन्न स्वरूपाच्या आहेत. त्याचे कारण सांस्कृतिक परिवर्तन ही व्यापक संकल्पना आहे. आणि सामाजिक परिवर्तन ही संकल्पना त्या तुलनेत मर्यादित आहे.

संस्कृतीच्या कोणत्याही घटकात बदल झाल्यास त्यास सांस्कृतिक परिवर्तन म्हणून ओळखले जाते. परंतु सर्वच सांस्कृतिक बदल हेच सामाजिक बदल असतीलच असे नाही.

उदाः मराठी नाटकांमध्ये विदूषक या पात्राच्या पुन्हा वापर करणे हे सांस्कृतिक परिवर्तन आहे. मात्र ते सामाजिक परिवर्तन होणार नाही. कारण सामाजिक परिवर्तन हे केवळ समाजरचनेतील बदलापुरते मर्यादित असते. परंतु संस्कृति ही व्यापक संकल्पना असल्याने त्यातील सामाजिक मूल्ये, नियमने, श्रद्धा यामध्ये बदल झाला तर ते सांस्कृतिक परिवर्तन सामाजिक परिवर्तन ठरू शकते. केवळ समाजाच्या संरचनेतील परिवर्तना एवढाच अर्थ मर्यादित आहे.

सामाजिक परिवर्तन घडून आल्यास त्यास सांस्कृतिक परिवर्तन असे ~~म्हण~~ म्हटले जाते. याचे कारण सामाजिक परिवर्तन हा समाजाच्या संरचनेचा एक भाग आहे. त्यामुळे सामाजिक परिवर्तन हे सांस्कृतिक परिवर्तन होऊ शकते. परंतु सांस्कृतिक परिवर्तन हे नेहमीच सामाजिक परिवर्तन असेलच असे नाही.

(10) <u>सामाजिक परिवर्तन ही अपरिहार्य संकल्पना आहे:-</u>

~~सामाजिक प~~

(11) <u>सामाजिक परिवर्तन ही अमूर्त संकल्पना आहे:-</u>

(12) <u>सामाजिक परिवर्तनाशी संबंधित संकल्पना किंवा सामाजिक परिवर्तनाचे प्रकार पुढीलप्रमाणे:-</u>

उत्क्रांती, क्रांती, प्रगती, विकास इ.

(13) <u>सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया:-</u>

संस्कृतीकरण, औद्योगिकरण, नागरीकरण, पाश्चिमात्यीकरण, आधुनिकीकरण, जागतिकीकरण इ.

* <u>सारांश:-</u>

मानवी समाजामध्ये निरंतरपणे सार्वत्रिक स्वरूपात घडून येणारी प्रक्रिया म्हणून सामाजिक

Scanned with CamScanner

परिवर्तन या संकल्पनेला ओळखले जाते. परिवर्तनामुळेच मानवी समाजाचा विकास घडून आलेला आहे.

B] आधुनिकीकरण आणि जागतिकीकरण (Modernization and Globalization):-

* प्रस्तावना (Introduction):-
सामाजिक परिवर्तन ही मानवी समाजामध्ये निरंतरपणे चालणारी प्रक्रिया म्हणून ओळखली जाते. समाजामध्ये सामाजिक परिवर्तन हे वेगवेगळ्या प्रक्रियेच्या माध्यमातून घडून येत असते. यामध्ये औद्योगिकीकरण, नागरीकरण, संस्कृतीकरण, पाश्चिमात्यीकरण, आधुनिकीकरण, जागतिकीकरण या प्रक्रियांचा समावेश आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये आधुनिकीकरण व जागतिकीकरण या दोन सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियांचा अर्थ समजून घेणे अपेक्षित आहे. तो पुढीलप्रमाणे:-

1] आधुनिकीकरण (Modernization):-
* प्रस्तावना:-
आधुनिकीकरण ही गुंतागुंतीची सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे. कोणत्याही प्रकारचे आधुनिकीकरण ही एक व्यापक संकल्पना आहे. कोणत्याही प्रकारचे तत्वज्ञान किंवा चळवळ यांच्याशी आधुनिकीकरणाचा संबंध येत नाही. तर केवळ परिवर्तन प्रक्रियेचा एक भाग म्हणून आधुनिकीकरणाकडे पाहिले जाते. जीवन विषयक आणि सामाजिक मूल्यांविषयक सदस्यांनी एक नवीन मार्ग स्विकारण्याची किंवा अंगीकारण्याची अभिनव प्रक्रिया या अर्थाने आधुनिकीकरण ही प्रक्रिया विचारात घेतली जाते. विशेषकरून परंपराकडून आधुनिकतेचा स्विकार करण्याच्या लोकांच्या जीवनशैलीला अनुसरून ही संकल्पना विचारात घेतली जाते. आधुनिकीकरण ही संकल्पना औद्योगिकीकरण

नागरिकरण, बुद्धिवाद यांच्याशी संबंधित असणारी प्रक्रिया आहे. परपरागत समाजाचे आधुनिक समाजात रुपांतर होण्याची क्रिया म्हणजे आधुनिकीकरण होय. आधुनिकीकरण या व्यापक ~~सक~~ संकल्पनेचा अर्थ पुढील व्याख्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

* **व्याख्या :-**

1] **टिशलेर, व्हायटन आणि हटर :-**
"पारंपारिक समाजाचे जसजसे औद्योगिकीकरण होऊ जाते तसे त्या समाजात घडून येणाऱ्या गुंतागुंतीच्या परिवर्तनाच्या संचाला आधुनिकीकरण असे म्हणतात."

2] **डेव्हिड, पॉपेनो :-**
"पारंपारिक औद्योगिकीकरण पूर्व समाजातील संस्थांचे औद्योगिकीकरण झालेल्या समाजातील संस्थाप्रमाणे सामाजिक रुपांतरण घडून येणे म्हणजे आधुनिकीकरण होय"

3] **लाईट केल्नर :-**
"प्रगत औद्योगिक देशातील समाजाप्रमाणे बदल किंवा परिवर्तन घडवून आणणे यालाच आधुनिकीकरण असे म्हटले जाते."

4] **योगेंद्र सिंह :-**
"आधुनिकीकरण ही सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक रुपांतराची प्रक्रिया असून ती मुलत: संचयशील व अभियोजनक्षम असते. त्याद्वारे निवड पद्धतीनेच समाजात संरचनात्मक बदलास प्रोत्साहन दिले जाते."

Scanned with CamScanner

Date: / /



* आधुनिकीकरण संकल्पनेचा उदय :-
आधुनिकीकरणाची संकल्पना युरोपमधील प्रबोधन काळाशी जोडली गेलेली आहे. औदयोगिकीकरणामुळे युरोपमधील समाजव्यवस्था, धर्म, संस्कृती, सामाजिक मूल्ये यामध्ये जे बदल घडून आले, त्याला अनुसरून आधुनिकीकरण ही संकल्पना वापरण्यात येऊ लागली. व्यक्तिस्वातंत्र्य, धर्मनिरपेक्षता, बुद्धिवाद यांसारख्या सामाजिक मूल्यांना प्रमाण मानण्यास सुरुवात झाली. त्याबरोबरच फ्रेंच राज्य-क्रांतीमधून स्वातंत्र्य, समता, बंधुता या सामाजिक मूल्यांचा उदय झाला. औदयोगिक क्रांतीचा परिणाम औदयोगिकरण, नागरिकरण या प्रक्रिया सुरु झाल्या. या सर्व प्रक्रियामधूनच आधुनिकीकरणास सुरुवात झालेली आहे. 19 व्या व 20 व्या शतकात वसाहतवादी धोरणांमधून ही प्रक्रिया आशिया व आफ्रिका देशांमध्ये गतिमान झाली. भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आधुनिकीकरणाची संकल्पना प्रभावीपणे स्विकारण्यात आलेली आहे.

* आधुनिकीकरणाचा अर्थ :-
विज्ञाननिष्ठ व विवेकबुद्धीवर आधारित सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया म्हणून आधुनिकीकरण संकल्पनेचा विचार केला जातो. केवळ औदयोगिकरण झाले म्हणजे त्याला आधुनिकीकरण म्हणता येत नाही. औदयोगिकरणा-बरोबरच पारंपारिक समाजातील संरचना, सामाजिक संस्था, सामाजिक मूल्ये, नियमने, श्रमविभाजन, सामाजिक स्तरीकरण, जीवनशैली यामधील बदलांना अनुसरून आधुनिकीकरण संकल्पना विचारात घेतली जाते.
थोडक्यात आधुनिकीकरण ही समग्र समाजाला व्यापून टाकणारी सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे.

Scanned with CamScanner

## * आधुनिकीकरणाची वैशिष्ट्ये:-

आधुनिकीकरण प्रक्रिया व्यापक स्वरूपाची असल्याने समाजातील बहुतांश सर्व घटकांना व्यापून टाकणारी प्रक्रिया आहे. या संकल्पनेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे:

### ① व्यापक प्रक्रिया:-

आधुनिकीकरण किंवा आधुनिकता ही व्यापक स्वरूपाची प्रक्रिया असून मानवी समाजातील वेगवेगळ्या अशा विभिन्न क्षेत्रामध्ये ही प्रक्रिया दिसून येते. आधुनिकीकरणाचा प्रभाव साहित्य, कला, शिक्षण, राजकारण, सामाजिक संस्था, सामाजिक मूल्ये, जीवनशैली अशा सर्व ठिकाणी दिसून येत असल्यामुळे आधुनिकीकरण ही प्रक्रिया व्यापक स्वरूपाची प्रक्रिया म्हणून ओळखली जाते.

### ② आधुनिकीकरण आणि प्रबोधन कालखंड:-

आधुनिक समाजाचा उदय केव्हा झाला हे निश्चित स्वरूपात सांगता येत नसले तरी त्याचा संबंध युरोपमधील प्रबोधन किंवा उद्बोधन कालखंडाशी आहे. कारण, या प्रबोधनाच्या कालखंडामध्येच पारंपारिक सत्ता, धर्म यावरती तार्किकतेच्या आधारावर अनेक विचारवंतांनी विचार मांडले. त्यामधूनच औद्योगिक क्रांती व फ्रेंच राज्यक्रांती घडून आली. यामधूनच आधुनिकीकरणाच्या संकल्पनेचा उदय झाला. त्यामुळे आधुनिकीकरण आणि प्रबोधनाचा कालखंड परस्परांशी संबंधित आहेत.

### ③ विभिन्न जीवनशैलीचा समावेश:-

आधुनिक समाजाची जीवनशैली व्यापक स्वरूपाची झालेली आहे. आधुनिक समाजात सांस्कृतिक विविधता, व्यक्तिवाद एका बाजूला निर्माण होत आहे. तर दुसरीकडे

Scanned with CamScanner

शिक्षणसंस्था विविध सामाजिक उपक्रम या माध्यमातून सामाजिक जीवनात समानता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. स्वातंत्र्य, बुद्धिवाद, बंधुभावनांचे प्रकटीकरण व्यक्तिमत्व आणि त्याची प्रतिष्ठा यांसारख्या नैतिक मूल्यांचा स्विकार केला जात आहे. परिणामी आजच्या आधुनिक समाजात विभिन्न अशा जीवनशैलींच्या समावेश झाल्याने समाजाची संरचना जटील स्वरूपाची झालेली आहे.

④ नागरीकरण :-

शहरांच्या संख्येत व आकारमानात वाढ होणे, त्यामधून शहरी वैशिष्ट्यांचा विकास होणे, म्हणजेच नागरीकरण घडून येणे, हे आधुनिकीकरणाचेच वैशिष्ट्य मानले जात आहे. व्यक्ति स्वतःच्या विकासासाठी प्रयत्न करत आहे. उच्च राहणीमानाची अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. हा सर्व आधुनिकीकरणाचाच भाग आहे.

⑤ औद्योगिकरण :-

आधुनिक समाजात विशेषत: भारतीय समाजात जलद गतीने औद्योगिकरण वाढत आहे. पाश्चात्त्य देशातील तांत्रिक साहाय्यातून औद्योगिक प्रगती साधली जात आहे. सर्व प्रकारच्या उद्योगांना साहाय्य देण्याचे धोरण स्विकारण्यात आलेले आहे. परिणामी वाढत्या लोकसंख्येच्या दैनंदिन गरजा पूर्ण केल्या जात आहे. या औद्योगिकरणाच्या प्रक्रियेमधूनच आधुनिकीकरणाची प्रक्रिया गतिमान झालेली आहे.

⑥ विशेषीकरण :-

उद्योग, व्यवसाय व इतर अर्थव्यवहारामध्ये विशेषीकरण घडून आलेले आहे. हे आधुनिकीकरणाचे

लक्षण आहे. सामाजिक, आर्थिक, राजकिय क्षेत्रात व्यक्तिला त्याच्या क्षमतेनुसार कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी उपलब्ध झाल्याने आर्थिक विकास घडून आलेला आहे. त्याबरोबरच सर्व क्षेत्रात साधे स्वरूप नष्ट होऊन गुंतागुंतीची अवस्था निर्माण झालेली आहे.

⑦ व्यापक शिक्षणप्रसार :-

आजच्या आधुनिक समाजात प्रत्येक व्यक्तिला साक्षर बनवणे अनिवार्य झालेले आहे. शिक्षणाबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानदेखिल आत्मसात केले जात आहे. या तंत्रज्ञानाच्या व शिक्षणाच्या साहाय्याने स्वतःचा व समाजाचा विकास साधला जात आहे. समाजातील बहुतांशी बदल घडवून आणण्याचे काम शिक्षण व्यवस्थेने केलेले आहे. त्यामुळेच व्यापक शिक्षणाचा प्रसार हे आधुनिकीकरणाचे वैशिष्ट्य मानले जात आहे.

⑧ सामाजिक व राजकिय चळवळी :-

सामाजिक व राजकिय क्षेत्रात नवनवीन चळवळी निर्माण होणे हे आधुनिकीकरणाचे लक्षण मानले जात आहे. राजकिय जीवनामध्ये जात, धर्म, भाषा, प्रदेश यांसारख्या संकुचित निष्ठांना महत्व न देता सर्व लोकांना सत्तेमध्ये सहभागी करून घेतले जात आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्य एकात्मता सामान्य लोकांना सामावून घेणारी लोकशाही व्यवस्था या मूल्यांचा राजकिय जीवनात पुरस्कार केला जात असल्याने अनेक राजकिय चळवळी निर्माण झालेल्या आहेत. या चळवळींच्या माध्यमातून सामाजिक व राजकिय क्षेत्रात परिवर्तन घडून येत आहे.

समाजव्यवस्थेमध्ये जन्म, जात, वंश कुटुंब यानुसार व्यक्तिला महत्व न देता व्यक्तिच्या कर्तृत्वाला महत्व दिले जात आहे. त्यामुळे

परंपराऐवजी राष्ट्रीय निष्ठांना महत्व दिले जात आहे. समानता, व्यक्तिवाद यांच्या विकासासाठी आवश्यक सामाजिक संबंध निर्माण केले जात आहेत. यामधूनच आधुनिक समाजाची निर्मिती केली जात आहे.

सामाजिक व राजकिय चळवळींच्या माध्यमातून आधुनिक अशा नवसमाजाची निर्मिती करणे हे आधुनिकीकरणाचे ध्येय मानले जाते.

⑨ आंतरराष्ट्रीय सहकार्यामध्ये वाढ :-

आंतरराष्ट्रीय संबंधातून संपूर्ण विश्व जवळ येत चालले आहे. राष्ट्रीय व जागतिक निष्ठांचा स्विकार केला जात आहे. आर्थिक समता, सामाजिक न्याय, राजकिय स्वातंत्र्य याला सर्वत्र महत्त्व दिले जात आहे. त्यामुळे सामाजिक गतिशीलतेमध्येही वाढ झाल्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर परस्परांना सहकार्य करण्यावर भर दिला जात आहे. अशा घटनांना आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत अधिक महत्त्व प्राप्त झालेले आहे.

⑩ धर्मनिरपेक्षता :-

आधुनिकीकरणाचा परिणाम सर्वत्र विशेषतः भारतात सर्व नागरिकांना धार्मिक क्षेत्रात आपापल्या स्वतंत्र विचारधारा व धर्मानुसार आचरण करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे. धार्मिक बाबतीत सहिष्णुता ही आधुनिकीकरणाची महत्वाची ओळख आहे.

⑪ सामाजिक परिवर्तन :-

आधुनिकीकरणात सामाजिक परिवर्तनाची गति शीघ्र स्वरूपाची असते. हे परिवर्तन अनेक क्षेत्रात दिसुन येते. समाजामध्ये सामाजिक सुधारणा चळवळी, युवक चळवळी या माध्यमातुन व्यापक परिवर्तन घडवून आणले जात आहे. अशा सामाजिक चळवळी

Scanned with CamScanner

सामाजिक परिवर्तनाला गतिशील बनवतात. त्यामुळे आधुनिकीकरणास प्रोत्साहन मिळते.

(12) जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण या सर्व प्रक्रिया आधुनिकीकरणाशी संबंधित आहेत.

(13) आधुनिकता हा बुद्धिसंगत दृष्टिकोन आहे.

(14) आधुनिक तंत्रज्ञान हे आधुनिकतेचे लक्षण मानले जाते.

(15) आधुनिक समाजात राज्य किंवा लोकशाही शक्तिशाली संस्था मानली जाते.

जेव्हा एखाद्या समाजात वरील वैशिष्ट्ये निदर्शनास येतात, त्यावेळी तेथे आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू होते. आधुनिकता म्हणजे नवीन सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक आणि बौद्धिक व्यवस्थेचे एक संच असतो. परंपरागत समाजव्यवस्थेपेक्षा तो पूर्णपणे वेगळा असतो. परंपरागत समाजात बदल घडवून आणणारी सर्वसमावेशक, विकास साधणारी प्रक्रिया म्हणून आधुनिकीकरणाला ओळखले जाते.

* आधुनिकीकरणाची कारणे :-

कोणत्याही एका कारणाने आधुनिकीकरण घडून येत नाही. ते घडून येण्यासाठी अनेक घटक जबाबदार असतात. ते पुढीलप्रमाणे:-

(1) शिक्षण :-

शिक्षण विशेषकरून विज्ञान, तंत्रज्ञानविषयक उच्च शिक्षण आधुनिकीकरणाच्या प्रमुख आधार आहेत. शिक्षणामधून कौशल्ये, विशिष्ट दृष्टिकोन, बुद्धिवाद, राष्ट्रीय निष्ठा निर्माण होते. त्यामुळे समाजामध्ये बदल परिवर्तन घडून येते. परिणामी शिक्षण हे आधुनिकीकरणास

Scanned with CamScanner

जबाबदार घटक म्हणून ओळखले जाते.

② **प्रसारमाध्यमे:-**

प्रसारमाध्यमांवर आधुनिकीकरण अधिक प्रमाणात अवलंबून असते. वर्तमानपत्र, नियतकालिके, आकाशवाणी, दूरदर्शन, संगणक, इंटरनेट आजची प्रगत माध्यमे, सोशल मिडिया. या सर्व साधनांच्या विकासामुळे आधुनिक विचारांच्या वेगाने प्रसार आलेला आहे. प्रगतीसाठी आवश्यक असणारे ज्ञान, दृष्टिकोन यांच्या समाजामध्ये प्रसार करण्यासाठी प्रसार माध्यमांची भूमिका महत्वाची ठरते. परिणामी आधुनिकीकरणाचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणून प्रसारमाध्यमांना ओळखले जाते.

③ **राष्ट्रवादी विचारसरणी:-**

राष्ट्रवाद आणि लोकशाही या संकल्पनांचा आधुनिकीकरणाशी अत्यंत घनिष्ठ संबंध येत असल्याने आधुनिकीकरण घडून येण्यामध्ये राष्ट्रवादी विचारसरणी, राष्ट्रीय विचार, जबाबदार ठरलेले आहेत. लोकांमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी, नवीन सामाजिक मूल्ये रुजवण्यासाठी लोकशाही व्यवस्था उपयुक्त ठरते. राष्ट्रवादी विचारसरणीतून लोकशाहीला आधार प्राप्त होत असल्याने या दोन्हीमधून आधुनिकीकरणास चालना मिळते.

④ **प्रभावी नेतृत्व:-**

आधुनिक सामाजिक मूल्ये, आधुनिक सवयी आणि श्रद्धा यांचा विकास करण्यामध्ये प्रभावी नेतृत्व आवश्यक असते. कारण देशातील नेतृत्वाकडून सत्तेचा गैरवापर होण्याची शक्यता असते. त्यामुळे लोकशाही, नवीन विचारसरणी, लोकशक्ती या सर्वांना

Scanned with CamScanner

न्याय देणारे प्रभावी नेतृत्व ज्या ठिकाणी असते, त्या ठिकाणी अधिक वेगाने आधुनिकीकरण घडून येते.
उदा:- भारतात सर्वप्रथम महाराष्ट्र शासनाने सन 1988 मध्ये स्त्री भ्रूणहत्ये विरोधात कायदा मंजूर केलेला होता.

⑤ प्रभावी शासकीय सत्ता :-
लोकांनी आधुनिक सामाजिक मूल्ये आणि जीवनविषयक दृष्टिकोन आत्मसात करण्यासाठी स्थिर प्रभावी शासकीय सत्ता, सरकार असणे आवश्यक असते. प्रभावी सरकार सत्तेत असेल तर कार्यक्षमपणे काम केल्यास आधुनिक विचारांचा प्रसार होण्यास मदत होते.

⑥ नागरीकरण
⑦ औद्योगिकरण
वरीलप्रमाणे आधुनिकीकरण घडून येण्यासाठी जबाबदार कारणे किंवा घटक स्पष्ट केली जातात.

* भारतातील आधुनिकीकरणाची प्रक्रिया :-
भारतात आधुनिकीकरणाची प्रक्रिया प्रामुख्याने पाश्चात्य समाजाच्या संपर्कातून ब्रिटिश राजवटीमध्ये सुरू झालेली आहे. ब्रिटिश काळात भारतातील सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रामध्ये बदल घडून आले. या सर्व बदलांना आधुनिकीकरण असे म्हणता येणार नाही. परंतु या सर्व बदलांचा मुळ उद्देश समाजाचे आधुनिकीकरण हाच होता.
व्यापक प्रमाणावर विचार केल्यास स्वातंत्र्यानंतर आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेला गती प्राप्त झाली. शिक्षण, औद्योगिकरण, नागरीकरण, प्रसारमाध्यमे, दूरसंचार साधने, समाजसुधारणा, सामाजिक संस्था, नोकरशाही, न्यायव्यवस्था या सर्व घटकांमध्ये

Scanned with CamScanner

जे परिवर्तन घडून आले, ते आधुनिकीकरणास पोषक ठरले. त्याचा परिणाम समाजाच्या सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परिवर्तन होऊ लागले. भारतातील संसदीय लोकशाही, प्रौढमताधिकार, वैज्ञानिक सुधारणा, पंचायत राज्यव्यवस्था, महिला मागील बालकल्याण, दुर्बल व सिमांत घटकांची प्रगती, महिला सबलीकरण, सामाजिक व आर्थिक विकास योजना हे सर्व परिवर्तन म्हणजे, आधुनिकीकरणाचीच प्रक्रिया आहे. असे असले तरी प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ योगेंद्र सिंग यांच्या मते, भारतात आधुनिकीकरण घडून आले असले तरी परंपरांचे उच्चाटन पूर्णपणे झालेले नाही.

वरीलप्रमाणे आधुनिकीकरण या संकल्पनेचा अर्थ, वैशिष्ट्ये आणि कारणे स्पष्ट केली जातात.

## 2] जागतिकीकरण - Globalization

* प्रस्तावना :-

जागतिकीकरण ही देखील सामाजिक परिवर्तनाची गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. 1980 च्या दशकात संपूर्ण विश्वामध्ये फार मोठे बदल घडून आले. त्यामधून जागतिक अर्थव्यवस्थेत जे बदल आले त्यालाच 'जागतिकीकरण' या नावाने ओळखले जाते. गेल्या द्विदशकापासुन जागतिकीकरण हा संपूर्ण विश्वामध्ये चर्चेचा विषय ठरलेला आहे. जागतिकीकरणाच्या अनुषंगाने जे विचारमंथन घडून येत आहे. त्यामध्ये त्याच्या समर्थनात व विरोधात ही विचार मांडले जात आहेत. सामाजिक जीवनावर जागतिकीकरण या प्रक्रियेचा मोठ्या प्रमाणात प्रभाव पडलेला आहे. परिणामी या संकल्पनेचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे आवश्यक आहे.

Scanned with CamScanner

* जागतिकीकरणाचा अर्थ:-

20 व्या शतकाच्या शेवटच्या दशकात संपुर्ण विश्वामध्ये आर्थिक व व्यापार क्षेत्रामध्ये व्यापक बदल घडून येण्यास प्रारंभ झाला. आर्थिक व्यवहारास उत्तेजनार्थ जलद दळणवळणाच्या सुविधा माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार यामुळे जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात, कोणतेही वस्तु किंवा सेवा उत्पादन करणे अथवा विक्री करणे शक्य होऊ लागले. त्यामधूनच जागतिकीकरणाची संकल्पना विकसित झाली. जागतिकीकरणास 'वैशाव' 'वैश्वीकरण' किंवा 'भूमंडलीकरण' या नावानेही ओळखले जाते. जागतिकीकरण ही प्रक्रिया आज जवळपास सर्वच राष्ट्रांमध्ये दिसुन येत आहे. या प्रक्रियेमुळे संस्कृति, उद्योगधंदे, तांत्रिक परिवर्तन, पर्यटन इ. चा फैलाव सर्व देशामध्ये होत आहे. वेगवेगळ्या देशामधील सीमा बंदिस्त न राहता जगातील सर्व मानवांनी एकत्रित येणे हे जागतिकीकरणामध्ये अभिप्रेत आहे. संपुर्ण विश्व एका समाज-व्यवस्थेचे रूप धारण करू लागले आहेत. अधिकाधिक व्यक्ती व संस्कृति यांचे परस्परांशी घनिष्ठ संबंध निर्माण व्हावे हा जागतिकीकरणामागचा उद्देश आहे. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक तसेच राजकिय संबंधाला आपल्या राष्ट्राच्या दृष्टीने बांधिस्त न करता त्यांना व्यापक स्वरूप प्राप्त करून देणे यालाच जागतिकीकरण म्हटले जाते.

Scanned with CamScanner

* व्याख्या - Defination :-

① थॉमस हिल :-

"परस्परावलंबी व एकरूप अशा जागतिक अर्थव्यवस्थेच्या दिशेने आलेला बदल म्हणजे जागतिकीकरण होय."

② जागतिक बँक :-

"जागतिकीकरण म्हणजे - ① उपभोग्य वस्तूंच्या समावेशासह सर्व वस्तूंवरील आयात नियंत्रणे रद्द करणे. ② आयात जकातीचे दर कमी करणे. ③ सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे खाजगीकरण करणे होय.

③ गिडन्स :-

"विश्वव्यापी आधारावर सामाजिक संबंधांना घनिष्ठतेच्या पातळीवर नेणाऱ्या संकल्पनेला जागतिकीकरण असे म्हटले जाते."

जागतिकीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की, विविध देशांच्या सीमा तोडून विविध समुदायांना व संघटनांना परस्पर संबंधांमध्ये जोडले आहे. ही एक प्रक्रिया जागतिक स्तरावर एका चळवळीच्या स्वरूपात सुरु असून विविध देशांमध्ये स्थायी स्वरूपाच्या आंतरक्रिया केल्या जात आहेत. जागतिकीकरणामुळे संपूर्ण विश्व एकात्म बनत आहे. तंत्रज्ञानामधील वाढ व विस्तारामुळे या एकात्मतेला गति मिळालेली आहे. व्यापार, वित्त, रोजगार, तंत्रज्ञान, दळणवळण, पर्यावरण, राहणीमान, समाजव्यवस्था, संस्कृती अशा सर्व क्षेत्रांमधून होत असणारे परिवर्तन म्हणजेच जागतिकीकरण होय.

Scanned with CamScanner

## * जागतिकीकरणाची वैशिष्ट्ये :

### ① विश्वात्मक संस्कृती :

आजच्या आधुनिक विश्वात अशी एक संस्कृती निर्माण होत चालली आहे जिचे स्वरूप विश्वात्मक आहे. यामध्ये कुटुंब, विवाह, मनोरंजन, साहित्य, कला अशा अनेक गोष्टींचा समावेश असुन संपुर्ण विश्वामध्ये त्याचा स्विकार केला जात आहे. संपुर्ण विश्वाची एकच संस्कृती अशा प्रकारचे स्वरूप प्राप्त होऊ लागले आहे.

### ② सांस्कृतिक एकात्मता :-

दळणवळणाची साधने, प्रसारमाध्यमे, पर्यटन, स्थलांतर या प्रक्रिया आधुनिक काळात अधिक गतिमान झालेल्या आहेत. जगभरातील भिन्न-भिन्न संस्कृतीमधील लोक परस्परांच्या जवळ येत चालले आहे. परस्परांमध्ये मिळून सांस्कृतिक किंवा संस्कृतीचे एकात्मीकरण घडून येण्यास सुरुवात झालेली आहे.

### ③ नवीन सामाजिक चळवळ :

जागतिकीकरणामध्ये विशेष करून विकसनशील देशांमध्ये जो परिवर्तन घडून येत आहे, त्यामधून काही नवीन सामाजिक चळवळींचा उदय झालेला आ[हे]. समता, मानवता, मानवाधिकार यांची चर्चा सर्वत्र होऊ लागलेली आहे. पर्यावरण, प्रदूषण, दहशतवाद यावरील चर्चा हा देखील जागतिकीकरणाचाच एक भाग आहे. जागतिकीकरणाच्या परिणाम असंख्य क्षेत्रामध्ये नवनवीन चळवळी उदयास आलेल्या आहे.

### ④ मुद्रा - विनिमयाचे साधन :

जागतिकीकरणाचे अत्यंत महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, संपूर्ण जगभर विनिमयाचे साधन मुद्रा हे

Scanned with CamScanner

आलेले आहे. आज विनिमयामध्ये वस्तु विनिमयाला स्थान दिले जात नाही. सर्व व्यवहार मुद्रा म्हणजेच आर्थिक स्वरूपात होत आहेत. या आर्थिक घटकांचा परिणाम संपूर्ण समाजव्यवस्थेवरती आलेला आहे.

⑤ बाजारपेठांना महत्व :-

जागतिकीकरणामध्ये व्यापार, उद्योगधंदे, बाजारपेठेचे महत्त्व वाढलेले आहे. जागतिक स्तरावर आर्थिक व्यवस्थेचे एक मोठे जाळे या बाजारपेठेने निर्माण केलेले आहे. संपुर्ण विश्वात उपभोग पद्धत एका समान पातळीवर निर्माण झालेली आहे.

वरीलप्रमाणे जागतिकीकरण या प्रक्रियेची वैशिष्ट्ये स्पष्ट केली जातात.

* जागतिकीकरण आणि भारत :-

१९८१ ते १९९० या कालखंडात भारतीय वस्तुंच्या निर्यातीबरोबरच आयात वस्तुंमध्ये देखील वाढ झाल्याने भारतावरील परकिय कर्ज वाढत गेल्याने मोठे आर्थिक संकट भारतासमोर निर्माण झालेले होते त्यावेळी या संकटातून बाहेर पडण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संस्थेकडून मदत घ्यावी लागली. परंतु ही मदत घेताना आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारतावरती काही अटी लादल्या. त्यामधूनच १९९१ मध्ये भारताने नवीन आर्थिक धोरण स्विकारले. ज्या अंतर्गत भारतीय अर्थव्यवस्था परकिय गुंतवणुकीसाठी खुली करण्यात आली. भारताच्या आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारावरील शासनाचे नियंत्रण कमी झाले. या आर्थिक धोरणाचा भाग १९९३ मध्ये जागतिक व्यापार संघटनेचा सदस्य म्हणून भारताने या करारावर स्वाक्षरी केली. आज आपण जो जागतिकीकरण शब्द वापरतो, तो शब्द

Scanned with CamScanner

भारतातील १९९१ पासुन सुरु असलेले धोरणात्मक बदल त्यामधून अभिप्रेत होतात. या बदलांचे भारतीय अर्थव्यवस्था व समाजव्यवस्था यावरती दुरगामी परिणाम झालेले आज दिसून येतात.

जागतिकीकरणाने भारतात भांडवलशाहीच्या, परकिय गुंतवणूकीच्या मोठ्या प्रमाणात विस्तार होत चाललेला आहे. प्रसारमाध्यमांमुळे जागतिकीकरणाचे परिणाम सर्व घटकांपर्यंत पोहोचलेले आहे. जागतिकीकरणातून भारतात स्पर्धा, उदारमतवाद, खाजगीकरण, लोकशाही, मानवाधिकार, सांस्कृतिक संघर्ष, श्रीमंत-गरिब विषमता अशा प्रकारचे चांगले-वाईट परिणाम झाल्याचे दिसुन येत आहेत.

जागतिकीकरणाचा सर्वाधिक परिणाम कुटुंब, संस्कृती, सामाजिक नियंत्रण यांवरती झालेला आहे. सांस्कृतिक विविधता वाढत चालली आहे. जागतिकीकरण आर्थिक एकात्मता काही प्रमाणात यशस्वी झाली असली तरी, सांस्कृतिक एकात्मता निर्माण करण्यात जागतिकीकरण अयशस्वी झाले आहे. जागतिकीकरणाच्या संदर्भात संक्षिप्त स्वरूपात असे म्हणता येईल की, जागतिकीकरणाची सुरुवात आर्थिक क्षेत्रात झाली. परंतु जागतिकीकरणाने सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक, धार्मिक, राजकिय या सर्व क्षेत्रांना प्रभावित केलेले आहे. जागतिकीकरणाचा भारतीय समाजावर सकारात्मक व नकारात्मक असा दोन्ही प्रकारचा प्रभाव, परिणाम झालेला आहे.

वरीलप्रमाणे जागतिकीकरण ही परिवर्तनाची प्रक्रिया स्पष्ट केली जाते.

Scanned with CamScanner

## c] Social Movements : Meaning and types

## सामाजिक चळवळी : अर्थ आणि प्रकार

* **प्रस्तावना :-**

समाजातील बहुसंख्य व्यक्तींकडून समाजातील काही महत्त्वपूर्ण घटकांमध्ये बदल घडवून आणण्यासाठी किंवा या घटकांमध्ये होणाऱ्या बदलांना विरोध करण्यासाठी केलेला प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून चळवळ म्हणजे सामुदायिक प्रयत्नांनी समाजात सामाजिक परिवर्तन घडवून आणणे, समाजातील काही महत्त्वाच्या प्रश्नांना समोर ठेवून चळवळी उदयास येत असतात. त्यासाठी मोर्चे, घोषणा, मिरवणुका इ. चा आधार घेतला जातो. तसेच यांच्या मागे परिवर्तनाचा विचार असतो. हा विचार विशिष्ट व्यक्ती-द्वारा पुढे आणला जातो. सामाजिक चळवळीला विशिष्ट अशा विचारसरणीचा आधार असतो. अशा वैचारिक तत्वज्ञानामुळे अनेक सदस्य व चळवळीशी जोडले जातात. त्यामुळे चळवळीचा प्रसार घडून येतो. या चळवळीमधून अनुकूल स्वरूपात बदल घडवून आणतात. चळवळीचे सातत्य हे चळवळीच्या यशापयशाचे महत्त्वाचे परिणाम ठरते. समाज व्यवस्थेच्या संदर्भात परिवर्तन घडवून आणण्यामध्ये चळवळीचा सहभाग किती आहे याचा अभ्यास समाजशास्त्रा-मध्ये केला जातो.

* **व्याख्या :-**

① **ड्रेसलर व विलिस :-**

"अनेक लोक हेतूपूर्वक आणि सामूहिकरित्या परिवर्तन घडवून आणण्याचा जेव्हा प्रयत्न करतात,

त्याला सामाजिक चळवळ असे म्हणतात."

② हर्बर्ट ब्लूमेर:-
" सामाजिक जीवनाची नवी व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी केला जाणारा सामूहिक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय."

③ जॉन विल्सन:-
" सामाजिक व्यवस्थेत व्यापक प्रमाणावरील परिवर्तन घडवून आणण्यासाठी किंवा घडून येणाऱ्या बदलांना प्रतिकार करण्यासाठी जाणिवपूर्वक संगठितरित्या केला जाणारा प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय."
प्रस्थापित समाजरचनेत बदल घडवून आणण्या-साठी केल्या जाणाऱ्या सामुदायिक स्वरूपाच्या मागण्या म्हणजे सामाजिक चळवळ होय. या संकल्पनेचा अर्थ पुढील काही घटकांच्या आधारे समजुन घेता येईल.

① सामाजिक चळवळीत अनेक लोक एकत्र येऊन जाणिवपूर्वक सामूहिक प्रयत्नांच्या माध्यमातून परिवर्तन करण्यासाठी काहीतरी कृती करतात.

② अशी सामुहिक कृती एकतर सामाजिक परिवर्तन घडून यावे यासाठी असते. किंवा होणाऱ्या परिवर्तनाला प्रतिकार किंवा विरोध करण्यासाठी असते.

③ असे सामुहिक प्रयत्न सातत्याने होत राहणे किंवा सापेक्षत: दिर्घकाळ चालु राहणे अभिप्रेत असते.

④ सामाजिक चळवळी अंतर्भुत असणारे सामुहिक प्रयत्न कमी अधिक स्वरूपात अभिप्रेत असतात.

Scanned with CamScanner

(5) सामाजिक चळवळी या अनिष्ठ रूढी परंपरा यांना विरोध करण्यासाठी निर्माण केल्या जातात.

(6) सामाजिक चळवळी लोकसहभागाशिवाय अस्तित्वात येत नाहि

(7) सामाजिक चळवळीला विशिष्ठ स्वरूपाची विचारप्रणाली असते

(8) सामाजिक चळवळी या विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेले असतात

(9) चळवळीमध्ये उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी विविध मार्गांचा अवलंब जातो. रस्ता रोखो, मोर्चा, घोषणा, दैनंदिन कामकाज बंद पाडणे.

(10) सामाजिक चळवळी प्रगतीसाठी उपयुक्त ठरतात. तर कधी-कधी चळवळी प्रगतीमध्ये अडथळा ठरू शकतात.

(11) प्रत्येक चळवळी समन्वय साधण्यासाठी नेतृत्व आवश्यक असत

(12) प्रत्येक चळवळीला विशिष्ट जिवन-चक्र आणि यश-अपयशाचे स्वरूप प्राप्त होत असते.

* <u>सामाजिक चळवळीचे प्रकार</u> (Types of Social movements):-

सामाजिक चळवळीची काही विशिष्ट स्वरूपाची उद्दिष्टे असतात. या उद्दिष्टांच्या आधारे सामाजिक चळवळींचे विविध प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाऊ शकते. तरीदेखील चळवळींचे स्वरूप इतके गुंतागुंतीचे असते की चळवळींच्या विचारप्रणाली भिन्न भिन्न तत्वांचा समावेश होत असल्याने एका विशिष्ट प्रकारात चळवळींचे वर्गीकरण करणे अत्यंत अवघड होऊन जाते. तरीदेखील चळवळींच्या प्रमुख उद्दिष्टांवरून चळवळींचे काही प्रमुख प्रकार पाडले जातात. ते पुढीलप्रमाणे:

① सुधारणा चळवळी (Reform movements):-
समाजव्यवस्थेमध्ये मर्यादित क्षेत्राच्या अंतर्गत किंवा समाजाच्या विशिष्ट भागात सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने प्रयत्न करणारी चळवळ म्हणजे सुधारणा चळवळ होय. या चळवळीमध्ये संपुर्ण समाजव्यवस्थेला विरोध नसतो, तर त्या समाजव्यवस्थेमधील काही मूल्यांना व प्रथांना विरोध असतो. आणि अशा मूल्यांमध्ये प्रथा, परंपरा, चालीरीती यामध्ये बदल घडवून आणणे याला अत्यंत महत्व दिले जाते. हा बदल घडवण्यासाठी हिंसक मार्गाचा अवलंब केला जात नाही. आपली उद्दिष्टे गाठण्यासाठी सुधारात्मक, शांततामय मार्गाचा वापर करून सदर बाबी समाजासाठी कशा हानिकारक आहेत, हे लोकांना पटवून दिले जाते. लोकशाही समाजात सुधारणा चळवळी मोठ्या प्रमावात उपलब्ध होऊ शकतात.

उदा:- ब्राह्मो समाजाची चळवळ, सत्यशोधक समाजाची चळवळ, स्त्री-मुक्तीची चळवळ इ.

② क्रांतिकारक चळवळ (Revolutionary movements):-
प्रस्थापित समाजव्यवस्थेत पुर्णपणे परिवर्तन घडवून आणण्यासाठी व त्या ठिकाणी नविन समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या उद्देशाने सुरु झालेली चळवळ म्हणजे क्रांतिकारी चळवळ होय. यामध्ये प्रस्थापित समाजव्यवस्था नष्ट करण्याचा, समाजव्यवस्थेच्या समग्र घटकांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. यासाठी हिंसात्मक मार्गाचाही स्विकार केला जातो. क्रांतिकारी चळवळी संस्थीकृत मार्गापेक्षा असंस्कृतीकृत मार्गाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. असे असले तरी सर्वच क्रांतिकारी चळवळी हिंसात्मक मार्गाचा अवलंब करतात असेही नाही.

Scanned with CamScanner

उदा:- भारतातील स्वातंत्र्य चळवळ, समाजवादी चळवळ इ.

③ **धर्मपंथीय चळवळ:-**
विशिष्ठ धर्मांतर्गत एखाद्या तत्वाचा अंगीकार करणाऱ्या लोकांचा पंथ धर्मामध्ये अस्तित्वात येत असतो. या विशिष्ठ पंथातील लोक विशिष्ठ तत्वानुसार आचरण करत असतात. अशा पंथामध्ये सहभागी होणारे अनुयायी एकाच धर्मातील किंवा विविध धर्माचे देखील असु शकतात. त्यांची सामाजिक आर्थिक, शैक्षणिक पार्श्वभूमी वेगवेगळी असु शकते. परंतु त्यांच्या वर्तनात एक समान तत्व निर्माण होत जाते. यातून त्या-त्या पंथाचे धार्मिक संकेत निर्माण होऊन त्या धार्मिक संकेतांप्रमाणे वर्तन करणाऱ्या व्यक्तिंची एक चळवळ उदयास येते. या चळवळीलाच धर्मपंथीय चळवळ म्हणून ओळखले जाते.
उदा:- ओशो पंथीयांची चळवळ.

④ **पुनरुज्जीवनवादी चळवळ:-**
पुनरुज्जीवनवादी चळवळीला प्रतिगामी स्वरूपाच्या चळवळी म्हणून देखील ओळखले जाते. या चळवळीचा मुख्य उद्देश परिवर्तनाला विरोध करून परंपरागत सामाजिक मूल्ये आहे त्याच स्थितीत ठेवण्याचा असतो. या चळवळी परिवर्तनाकडे विकास म्हणून न पाहता अधोगतीचे प्रतिक म्हणून पाहतात. पारंपारिक मूल्ये कशी व चांगली आहेत याची मांडणी या चळवळीच्या माध्यमातून केली जाते.
उदा:- गांधीजींची खादी चळवळ, हिंदूत्ववाद्यांची चळवळ.

Scanned with CamScanner

⑤ प्रतिकार चळवळी :-

समाजातील बदलाच्या स्थितीला विरोध करण्यासाठी प्रतिकार चळवळी अस्तित्वात येतात. जलद गतीने होणाऱ्या परिवर्तनामुळे समाजव्यवस्थेला धोका पोहोचतो. परंपरागत सामाजिक मूल्ये, परंपरा, आदर्श या बाबी नविन स्वरूपामुळे नष्ट होतात. या भूमिकेतून भावनेतून अशा बदलांना विरोध करण्यासाठी प्रतिकार चळवळी आकारास येतात.

उदा:- राखीव जागांविरोधी चळवळ, हिंदी भाषाविरोधी चळवळ

⑥ आदर्शवादी चळवळी :-

संपूर्ण समाज आदर्श बनविण्याची कल्पना काही व्यक्ती बाळगत असतात. यामधून या चळवळी उदयास येतात. आदर्शवादी चळवळी समग्र समाज किंवा समाजातील विशिष्ट विभागाला आदर्शवादी व्यवस्था प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करतात. परंतु यामध्ये पूर्णपणे यश मिळेलच असे नाही.

उदा:- कार्ल मार्क्सच्या विचारांवर आधारित कम्युनिस्ट चळवळ.

⑦ अभिव्यक्ती चळवळ :-

प्रस्थापित समाजव्यवस्थेमधील विशिष्ट स्थितीमध्ये व्यक्तीला राहणे अशक्य होते. व अशा स्थितीतून त्याला बाहेर पडणेही शक्य नसते. तसेच प्रस्थापित समाजव्यवस्थेत बदल घडवून आणण्यासही अशा व्यक्ती असमर्थ असतात. त्यावेळी त्यांची मानसिक स्थिती अशी बनते की, आहे त्या स्थितीशी समायोजन साधण्याचा प्रयत्न करून करतात व त्यातून आपले जीवन समाधानी बनवण्याचा प्रयत्न करतात. दु:खदायी वर्तमान स्थिती विसरून व्यक्तिगत समाधान मिळवण्यावर भर देण्यासाठी लोक अशा चळवळीत सहभागी होतात. आपल्या मनाला वाटेल तसे वागण्याचा, जीवन

Scanned with CamScanner

जगण्याचा सामुहिक प्रयत्न करतात त्याला अभिव्यक्ती चळवळ म्हणतात.
उदा:- हरे राम, हरे क्रिष्णा चळवळ, अमेरिकेतील हिप्पी चळवळ.

⑧ स्थलांतर चळवळी:-

* सारांश:-
वरीलप्रमाणे सामाजिक चळवळींचे प्रकार स्पष्ट करता येतात. सामाजिक चळवळींच्या माध्यमातून एखाद्या सामाजिक समस्येला प्रकाशात आणून त्यासंबंधी जनजागृती केली जाते. समाजव्यवस्थेमधील दोष दूर करण्याचा प्रयत्न केला जातो.

Important Question.

1. सामाजिक परिवर्तन या संकल्पनेचा अर्थ आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
2. आधुनिकीकरण या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करा.
3. आधुनिकीकरण या सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेचा अर्थ स्पष्ट करा.
4. जागतिकीकरण ही संकल्पना स्पष्ट करा.
5. जागतिकीकरण या संकल्पनेचा अर्थ आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
6. सामाजिक चळवळीचा अर्थ सांगून प्रकार स्पष्ट करा.

* टिपा लिहा.
1. सामाजिक परिवर्तनाचा अर्थ
2. सामाजिक परिवर्तनाची वैशिष्ट्ये
3. आधुनिकीकरण
4. आधुनिकीकरणाची वैशिष्ट्ये
5. आधुनिकीकरणाची कारणे

Scanned with CamScanner

MAHAGURU Page No. :
Date: / /



(6) जागतिकीकरण
(7) जागतिकीकरणाची वैशिष्ट्ये
(8) सामाजिक चळवळी
(9) सामाजिक चळवळीचा अर्थ
(10) सामाजिक चळवळीचे प्रकार

Scanned with CamScanner